नि.दि.दा नं.२६९/२०१६

गणपत वि. कुतबुद्दीन

## निशाणी ४६ वरील आदेश

सदरचा अर्ज मयत वादींचे वारस/अर्जदार यांनी वारसदार म्हणुन रेकॉर्डवर घेणेकरीता व त्याअनुषंगाने दाव्यात दुरुस्तीस परवानगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराचे प्रस्तुत अर्जात थोडक्यात असे कथन आहे की, मुळ वादी हे दि.०९.१०.२०२० रोजी मयत झालेले आहेत. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमीत भागाचा ताबा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्याबाबत प्रस्तुत वारसांना नुकतीच माहिती झालेली आहे. वादीच्या पश्चात अर्जात नमुद वारसांचा दावा मिळकतीमध्ये हक्क व अधिकार निर्माण झालेला आहे. त्यामुळे मयत वादीचे कायदेशीर वारस म्हणुन अर्जदार हे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे मयत वादीचे वारसदार म्हणुन कमलाबाई गणपत उर्फ सजन पोटफोडे व बाळासाहेब गणपत उर्फ सजन पोटफोडे यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शविलेला आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, मुळ वादी हे दि.०९.१०.२०२० रोजी मयत झालेले आहेत. परंतु प्रस्तुतचा अर्ज मुळ वादी मयत झाल्यानंतर एक वर्षाच्या विलंबाने दाखल केलेला आहे. सदर अर्जदाराने विलंब माफ होवून मिळण्याकरीता स्वतंत्र अर्ज दाखल केलेला नाही. तसेच विलंबाबत अर्जदाराने कोणतेही कारण दिलेले नाही. शेवटी प्रतिवादींनी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

०४. प्रस्तुतचा अर्ज व प्रतिवादींचे म्हणणे आणि प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांना वेळोवेळी पुकारले असता गैरहजर.

०५. वादी गणपत उर्फ सजन पांडुरंग पोटफोडे यांनी प्रस्तुतचा दावा अतिक्रमीत भागाचा कब्जा मिळणेसाठी व निरंतरच्या ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार कमलाबाई व बाळासाहेब यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे मयताचे वारसदार म्हणुन त्यांना रेकॉर्डवर घेण्याकरीता विनंती केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीतर्फे वकीलांनी वादीचा मृत्युचा दाखला दाखल केलेला आहे. त्यावरुन वादी गणपत पांडुरंगर पोटफोडे हे दि.०९.१०.२०२० रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दि.२३.११.२०२१ रोजी दाखल केल्याचे दिसुन येते.

यावरुन मुळ वादी मयत झाल्यापासुन सुमारे एक वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट होते.

०६. याठिकाणी एक बाब नमुद करणे आवश्यक आहे की, मुळ वादी मयत झाल्यापासुन एक वर्षापेक्षा जास्त कालावधी होवून गेल्यामुळे अर्जदार यांनी कायदेशीर तरतुदीप्रमाणे अबेटमेंट रद्द होवून मिळण्याकरीता व वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता झालेला विलंब माफ होवून मिळण्याकरीता स्वतंत्र अर्ज दाखल करणे आवश्यक होते. तथापी अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केवळ वारस रेकॉर्डवर घेण्याची विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्याकरीता कायदेशीर तरतुदीप्रमाणे आवश्यक असा स्वतंत्र अर्ज प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ झाल्याशिवाय अर्जदार यांनी केलेल्या प्रस्तुत मागणीचा विचार करणे कायदेशीर ठरत नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार यांनी वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्याकरीता स्वतंत्र अर्ज दाखल केलेला नसल्यामुळे अर्जदार यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कारण नमुद केलेले नाही याही कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

नि.४६ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

KULKARNI DATTATRAYA RAMESH
Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2025.08.26 11:40:21 +0530

शेवगाव

(डी.आर. कुलकर्णी)

दिनांक: २५.०८.२०२५

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
शेवगाव